श्रीक्षेत्र आळंदी (प्रतिनिधी) लोकप्रिय व समाजाची जाण असलेले रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून समाजाची अखंड सेवा होत असून त्यांचे समाजाप्रती प्रेम व कार्य अलौकिक आणि सर्व समाजाला प्रेरणादायी आहे, असे गौरवोदगार ह.भ.प.वासुदेव महाराज यांनी श्रीक्षेत्र आळंदी येथे शुक्रवारी काढले.

श्री सदगुरू वामनबाबा, श्री गुरूवर्य सावळाराम महाराज, श्री गुरू आप्पा माऊली पायी दिंडीच्यावतीने श्रीक्षेत्र आळंदी येथील नवीन धर्मशाळेतील स्व.भागुबाई चांगु ठाकूर सभागृहाचा हस्तांतरण सोहोळा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते व ह.भ.प.वासुदेव महाराज यांच्या अध्यक्षतेखाली ज्ञानेश्वर माऊलीच्या जयघोषात पार पडला. त्याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना वासुदेव महाराज बोलत होते. या समारंभात दिंडीच्यावतीने लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

वासुदेव महाराज पुढे म्हणाले की, सर्व समाजासाठी सतत झटणारे रामशेठ ठाकूर, प्रशांतला भेटण्याची ओढ लागली होती. आजच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने ती पूर्ण झाली. पूर्वी आमच्या भेटी-गाठी होत असत, त्या आता होत नसल्या तरी जेव्हा आमदार प्रशांत ठाकूर यांना टि.व्ही.वर बातम्या किंवा एखाद्या कार्यक्रमात बघतो तेव्हा टि.व्ही.ला टक लावून मी असतो. अत्यंत हुशार असा लोकप्रतिनिधी म्हणून अभ्यासपूर्ण वक्तव्य, भाषण आणि काम करण्याची जिद्द त्याच्यातून पहायला मिळते असे सांगून रामशेठ ठाकूर आणि प्रशांत ठाकूर यांनी सामाजिक बांधिलकी जपली असून त्यांच्या कार्यातून ती नेहमी दिसून येते, असेही वासुदेव महाराज म्हणाले.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, ज्ञानेश्वर माऊलींच्या दर्शनाला रायगड जिल्हयातून मोठया प्रमाणात वारकरी येथे येत असतात. त्यांची राहण्याची सोय व्हावी यासाठी श्री सदगुरू वामनबाबा, श्री गुरूवर्य सावळाराम महाराज, श्री गुरू आप्पा माऊली पायी दिंडीच्यावतीने आळंदीमध्ये धर्मशाळा उभारण्यात आली आहे. अत्यंत चांगल्या पध्दतीने भव्य प्रमाणात बांधलेली ही धर्मशाळा वारकरी मंडळींसाठी महत्वाची वास्तू ठरत आहे. आणि त्या धर्मशाळेतील सभागृहाला मातोश्री स्व.भागुबाई चांगु ठाकूर यांचे नाव देवून वारकऱ्यांनी आमच्यावर असलेले प्रेम प्रकट केले असल्याचे सांगून त्याबद्दल रामशेठ ठाकूर यांनी वारकरी मंडळींचे आभार व्यक्त केले. देवाच्या चरणी लीन होवून व संतांच्या ऋणात राहून सतत जनसेवा करण्याची इच्छा कायम आहे, असेही ते म्हणाले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी धर्मशाळेसाठी आणखी १५ लाख रूपयांची देणगी जाहीर केली.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना, धर्मशाळेला अनेकांनी मोठया रक्कमेची देणगी दिल्या असतानाही लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यावर असलेले प्रेम आणि आदरापोटी धर्मशाळेच्या सभागृहाला स्व. भागुबाई चांगु ठाकूर यांचे नाव दिल्याबद्दल वारकरी मंडळी व दिंडी सोहळयाचे सर्वप्रथम आभार व्यक्त केले तसेच तुमच्या सर्वा ंचे ऋण न फिटणारे असून कायम तुमच्या ऋणातच राहायला आवडेल असेही आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले. ते पुढे म्हणाले की, संसारातील अडी-अडचणी दूर सारून वारकरी नित्यनियमाने दरवर्षी पायी दिंडी सोहळयास जावून माऊलीचे दर्शन आपल्या डोळयात सामावून घेत असतात. संत प्रवचनातून माणुसकीची भावना निर्माण होत असते म्हणून अध्यात्माला अनन्य साधारण महत्व असून ते जपण्याचे काम वारकरी सांप्रदायातून होत असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले. यावेळी त्यांनी आळंदीचे नगराध्यक्ष व नगरपालिका प्रशासन यांच्याशी समन्वय साधून येथे श्रीक्षेत्र आळंदीमध्ये रस्ते, गटारे, पार्किंग व इतर अडचणी सोडविण्यासाठी तसेच श्रीक्षेत्र आळंदीच्या विकासासाठी जास्तीत-जास्त निधी मिळावा, याकरिता शासन दरबारी प्रयत्न करणार असल्याचे स्पष्ट केले.

यावेळी आळंदी नगरपालिकेचे नगराध्यक्ष राहुल पाटील शितळकर यांनी श्रीक्षेत्र आळंदीमध्ये या धर्म शाळेच्या निमित्ताने एक चांगली व भव्य वास्तू उभी राहिली असल्याचे सांगून पुढील वाटचालीकरिता त्यांनी दिंडीला शुभेच्छा दिल्या.

दिंडीचे संयोजक जी.आर.पाटील यांनी प्रास्ताविकातून धर्मशाळेच्या उभारणीसंदर्भात उपस्थितांना माहिती दिली. या धर्मशाळेत १०२ खोल्या असल्याचा आवर्जून उल्लेख केला. या पायी दिंडीच्या माध्यमातून

हजारो भक्तगण माऊलीच्या भेटीला येत असतात त्यांना येथे राहण्याची सोय व इतर सुविधा मिळाव्यात यासाठी आळंदी येथे धर्मशाळा असावी हा उद्देश होता. त्यानुसार चार वर्षापुर्वी भूमीपुजन झाले आज भव्य अशी धर्म शाळेची इमारत उभी राहिली आहे. यामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यापूर्वीच २५ लाख रूपयांची देणगी दिली असल्याचेही पाटील यांनी सांगितले. त्यांच्या आईच्या नावाने सभागृह असावा ही सर्व दिंडीतील वारकरी मंडळींची इच्छा होती ती आजच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने पूर्ण होत आहे, असेही ते म्हणाले. त्याचबरोबर इतरही देणगीदारांचे आभार व्यक्त करीत असताना आळंदीमध्ये भव्य-दिव्य धर्मशाळा उभी राहिली असल्याचे जी.आर.पाटील यांनी म्हंटले.

या समारंभास इंटकचे प्रदेश कार्याध्यक्ष महेंद्र घरत, पनवेल तालुका कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत, शहर कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, रायगड जिल्हा परिषद पक्षप्रतोद राजेंद्र पाटील, दिंडी सोहोळयाचे अध्यक्ष रामदासबुवा पाटील, उपाध्यक्ष बाळाराम पाटील, सचिव नारायण काटे, आळंदी नगरपालिकेचे नगरसेवक प्रशांत कुऱ्हाडे, सचिन पाचुंदे, सचिन कातवडे, उध्दव दामणे, वसंतराव कुऱ्हाडे, पिंपरी चिंचवडचे नगरसेवक धनंजय आल्हाड, राजेंद्र धुंधरे यांच्यासह राजाराम महाराज, भगवानशेठ गायकर, नारायणबुवा पाटील, बी.एस.पाटील, निवृत्तीबुवा चौधरी, जालिंदर काळोखे महाराज, बामा पावशे, कैलासबुवा पाटील, नामदेव केणी, संतोष भोईर, जयरामबुवा पाटील, सुरेशबुवा ठाकूर, प्रल्हाद केणी, दिनेश शिरसाट, शिवाजी दुर्गे, संतोष पाटील, उत्तम कोळी, एम.डी.पाटील यांच्यासह अनेक मान्यवर आणि वारकरी सांप्रदायातील मंडळी मोठया संख्येने उपस्थित होते.